Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/शा.टे./वि.प.प्र/ No - 151 दि. 14 MAY 2025

# : परिपत्रक :

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी तयार करण्यात आलेल्या सुधारित एसओपी बाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळांने मान्यता दिल्यानुसार विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी तयार केलेली एसओपी सर्व संलग्नीत महाविद्यालयानी महाविद्यालयाच्या माहिती पुस्तकामध्ये (Prospectus) समाविष्ठ करावी. तसेच सदरची एसओपी विद्यार्थी व शिक्षक यांच्या निदर्शनास आणावी.

सोबत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी तयार केलेली सुधारित एसओपी जोडली आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

डॉ.पी.एस.पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत वरील प्रमाणे

E:\Nilesh\Meeting Folder 2025-26\ SOP Meeting Folder\Meeting Minutes.docx

**विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयीन प्रवेश प्रकियेसाठी एस.ओ.पी मध्ये समावेश करावयाच्या बाबी - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार खालील प्रमाणे सुविधा विद्यार्थ्यांस उपलब्ध असणार आहेत.**

१. सर्व विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षामध्ये घेतलेल्या तीन विषयापैकी दुसऱ्या वर्षी १ मेजर व १ मायनर विषय विद्यार्थ्यांना निवडावे लागतील.

२. दुसऱ्या वर्षी निवडलेले मेजर व मायनर विषयच तिसऱ्या वर्षी अनुक्रमे मेजर व मायनर म्हणून बंधनकारक राहतील.

३. Open Elective (OE) हा ज्या विद्याशाखेचा आहे ती विद्याशाखा सोडून इतर विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनी तो निवडायचा आहे. उदा. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने तयार केलेल्या O.E त्याच विद्याशाखेच्या B.Com अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना घेता येणार नाही. परंतू मानव्यविज्ञान विद्याशाखा, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा तसेच आंतरशाखीय अभ्यास विद्याशाखा मधील विद्यार्थ्यांना तो घेता येईल.

४. O.E पेपर १ ते O.E पेपर ५ हे एकाच विषयाचे असणे बंधनकारक नाही. ते वेगवेगळया विषयाचे असू शकतील.

५. SEC (Skill Enhancement Course) पेपर- १ ते SEC (Skill Enhancement Course) पेपर ४ एकाच किंवा वेगवेगळया विषयाचे निवडता येऊ शकतील. तथापि VSC (Vocational Skill Courses) हे Major किंवा Minor संबंधित असावेत.

६. VEC (ValueEducation Course) विषय अभ्यास मंडळे विभागाने निर्गमीत केलेल्या नियमावली प्रमाणे असतील.

७. AEC ( Ability Enhancement Course) हा इंग्रजी आवश्यक पेपर असेल.

८. इंडियन नॉलेज सिस्टम (IKS) प्रथम वर्षच्या सर्व विद्यार्थीना समान अभ्यासक्रमाचा (Generic) असेल. तथापि भाग - २ साठी IKS हा मेजर स्पेसिपिक असेल.

९. C.C (CO-Curriculer Course) च्या विद्यार्थ्यांनी ६० तासांचा कार्यभार पूर्ण करणे आवश्यक आहेत.

१०. CEP (Commnity Engagement Program), C.C (Co-curriculer Course), F.P (Field Project) आणि R.P (Research Project) याबाबत विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या नियमानुसार कार्यवाही करावी. CEP चे ६० तासांचा कार्यभार पूर्ण करणे आवश्यक असून केलेल्या कामाची डायरी आणि प्राजेक्ट रिपोर्ट विद्यार्थ्यांनी तयार करणे बंधनकारक आहे.

११. F.P (Field Project), C.E.P, O.J.T, R.P हे मेजर विषयाशी संबंधित असतील.

१२. OJT (On Job Training/Internship/Apprentiship) याबाबत शिवाजी विद्यापीठाने लागू केलेल्या धोरणानुसार कार्यवाही करावयाची आहे.

१३. Skill Enhancement Courses चे Assessment करणेसाठी विद्यापीठाच्या NEP Regulation २.० नुसार Skill Assessment Board ची स्थापना करण्यात यावी.

१४. पदवी अभ्यासक्रमाचे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर UG Certificate घेवून बाहेर (Exit) पडता येईल. पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षानंतर UG Diploma घेवून बाहेर (Exit) पडता येईल. सदर विद्यार्थ्यांना NSQF नुसार उन्हाळी सुटटीतील चार श्रेयांकाचा व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल.

१५. पदवी अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षानंतर UG डिग्री घेवून विद्यार्थी बाहेर पडू शकेल.

१६. पदवी अभ्यासक्रमाच्या (ऑनर्स विथ रिसर्च) चौथ्या वर्षाला प्रवेश मिळविण्यासाठी ७.५ CGPA किंवा ७५% मार्क असणे अनिवार्य आहे.

१७. चौथे वर्ष पूर्ण केल्यानंतर Honours पदवी प्राप्त होवू शकेल तसेच ज्या विद्यार्थ्यांनी संशोधन पदवीला प्रवेश घेतला आहे. त्यांना चौथ्या वर्षानंतर Hons With Research पदवी प्राप्त होऊशकेल.

१८. चार वर्षाची पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्याला पदव्युतर पदवीच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश मिळविता येईल.

१९. तीन वर्षाची पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युतर पदवीच्या प्रथम वर्षात प्रवेश घेता येईल.

२०. पदव्युत्तर पदवीचे प्रथम वर्ष पूर्ण झालेनंतर विद्यार्थी बाहेर (Exit) पडणार असेल तर त्याला उन्हाळी सुटटीतील चार श्रेयांकाचा व्यावसायिक अभ्यास किंवा कौशल्य वृध्दी अभ्यास पूर्ण करावा लागेल. त्यानंतर त्याला पदव्युत्तर पदविका (Post Graduate Diploma) मिळू शकेल.

२१. पदव्युत्तर पदवीचे दुसरे वर्ष पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवी प्राप्त करता येईल.

यासंदर्भात अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी निर्गमीत केलेले NEP Regulation २.० अवलोकनी घ्यावे.